ePaper
वर्ष - 9 I अंक - 178 UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज ™
WWW.MAHAENEWS.COM | सोमवार, दि. 23 फेब्रुवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## जम्मू-काश्मीरमध्ये लष्कराची मोठी कारवाई; 2 दहशतवादी ठार





पान 2 वरुन...

पुणे स्टेशन परिसरात चिमुकलीवर अत्याचार

## AI समिटमधील कृतीमुळे पंतप्रधान नरेंद्र मोदींचा काँग्रेसवर घणाघात

# काँग्रेस आधीच 'नग्न पक्ष'

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**एआय ग्लोबल समिटमध्ये काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी शर्टलेस निदर्शने केल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संताप व्यक्त केला आहे. काँग्रेसच्या या कृतीमुळे राष्ट्रीय कार्यक्रम कमकुवत केल्याचा त्यांनी आरोप केलाय. या निषेधामुळे तांत्रिक प्रगती आणि नवोपक्रमावर लक्ष केंद्रित करणाऱ्या राष्ट्रीय कार्यक्रमाच्या प्रतिष्ठा मलिन झाली आहे, असं मेरठमधील एका सार्वजनिक कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.**



### काँग्रेसला माझी कबर खोदायची आहे!

काँग्रेसने तर आपल्याच देशाला बदनाम करायला प्रयत्न करत आहे. काँग्रेसच्या नेत्यांची मोदींशी दुष्मनी आहे. त्यांना माझी कबर खोदायची आहे. माझ्या आईलाही ते शिव्या देतात. त्यांचा भाजपा, एनडीएला विरोध आहे. तुम्हाला राजकारणात हेच करणं गरजेचं असेल तर आम्ही हेही सहन करू. पण काँग्रेसने लक्षात ठेवलं पाहिजे की एआय ग्लोबल समिट हा भाजपाचा समारंभ नव्हता. तिथे भाजपाचा नेताही उपस्थित नव्हता. हा देशाचा कार्यक्रम होता. देशाच्या सन्मानाचा कार्यक्रम होता. काँग्रेसने सर्व मर्यादा तोडली. आता पूर्ण देश काँग्रेसच्या नीतीवर थुंकत आहे, असंही मोदी म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, भारतात जागतिक एआय संमेलन झाले. जगभरातील ८० हून अधिक देशाचे प्रतिनिधी दिल्लीत आले होते. जगभरातील २० हून अधिक देशांचे राष्ट्राध्यक्ष भारतात आले. लाखो लोक भारताच्या काना कोपऱ्यातून दिल्लीत आले होते. जगातील विकसिनशील देशात असं संमेलन कधीच झालं नव्हतं, तसं एआय संमेलन भारतात झालं, तुम्हाला गर्व वाटला की नाही?”

“संपूर्ण देश गर्वाने व्यापलेला आहे. पण काँग्रेस आणि त्यांच्या इको सिस्टमने काय केलं? काँग्रेसने भारताच्या एक वैश्विक आयोजनाला आपल्या घाणेरड्या आणि नग्न राजकारणाचा आखाडा बनवला. समारोह स्थळावर विदेशी अतिथींसमोर काँग्रेसचे नेते कपडे काढून पोहोचले. मी काँग्रेसवाल्यांना विचारतो, देशाला माहितये तुम्ही आधीच नग्न आहात, मग कपडे उतरवण्याची गरज काय होती? काँग्रेसच्या नेत्यांनी तिथे जे काही केलं , त्यामुळे असं दिसतंय की देशातील सर्वांत जुना पक्षाचं वैचारिक दिवाळं निघालं आहे”, अशी टीका नरेंद्र मोदींनी केली.

### एआय समिटमध्ये काय झालंय?

दरम्यान, जागतिक एआय शिखर परिषदेचे आयोजन करणाऱ्या दिल्लीतील भारत मंडपमच्या हॉल क्रमांक ५ मध्ये भारतीय युवा काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी निदर्शने केले होते. पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सुमारे १० निदर्शकांनी क्यूआर कोडेड प्रवेश पास वापरून कार्यक्रमस्थळी प्रवेश केला आणि नंतर त्यांचे टी-शर्ट काढून पंतप्रधानांविरुद्ध घोषणाबाजी केली. निदर्शकांनी मोदी आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रतिमा असलेले पांढरे टी-शर्ट घातले होते किंवा त्यांच्या हातात होते, तसेच “भारत-अमेरिका व्यापार करार”, “एपस्टाईन फाइल्स” आणि “पंतप्रधानांशी तडजोड झाली आहे” अशा घोषणाही दिल्या होत्या.

### मेट्रो नेटवर्कमध्ये भारत तिसऱ्या क्रमांकावर

आज मेट्रो नेटवर्कच्या बाबतीत भारत जगातील तिसरा सर्वात मोठा देश बनला आहे, असे सांगत पंतप्रधानांनी यूपीतील मेरठसह अनेक शहरांत मेट्रोचे काम सुरू असल्याचे नमूद केले. गेल्या 11 वर्षांत मेट्रो अनेक शहरांपर्यंत पोहोचली, कारण भाजप सरकार नागरिकांना सुविधा देण्यावर भर देते, असेही ते म्हणाले.

### राहुल गांधीमुळे मित्र पक्षांचं नुकसान



“इतक्या जुन्या पक्षाचा नेत्याला लाज वाटण्यापेक्षा तो गर्जत आहे. देशाची बेइज्जती करण्याऱ्यांचा जयकार करत आहेत. संसदेत काहीच सादर करू शकत नाही, आपल्या मित्रपक्षांनाही बोलायला देत नाहीत. संसदेत कामकाज करू देत नाहीत. याचा सर्वात मोठं नुकसान काँग्रेसच्या मित्रपक्षांना होत आहे. दिल्लीत नग्नपणा दाखवला, त्यामुळे त्यांचे मित्रपक्षही आश्चर्यचकित झाले आहेत”, असंही ते म्हणाले. “जर तुम्हाला पंतप्रधानांच्या खूर्चीवर बसायचं असेल तर आधी जनतेचं मन जिंकावं लागेल. महिला खासदारांना पाठवून जागेवर कब्जा करून पंतप्रधान करता येत नाही. माता भगिनींना पुढे करण्याची काय मजबुरी झालीय तुमची?”, असंही ते म्हणाले.

# पुणे स्टेशन परिसरात चिमुकलीवर अत्याचार

## रेल्वे स्थानकावरुन 4 वर्षांच्या चिमुकलीचं अपहरण; आरोपी अटकेत

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे रेल्वे स्थानकावरून चार वर्षांच्या मुलीचे अपहरण करून तिच्यावर अत्याचार केल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. पुणे लोहमार्ग पोलिसांनी नराधम महेश यादव (वय 25) याला अटक केली असून तो मूळचा मध्य प्रदेशचा आहे.**



मध्य प्रदेशातील खंडवा जिल्ह्यात राहणारी 30 वर्षांची महिला तिचा पती, सासू आणि चार मुलांसह रोजगारासाठी महाराष्ट्रात आली होती. मनमाड–सोलापूर या भागात महिला व तिचा पती काम करत होते.16 फेब्रुवारीला रात्री महिला आणि तिचे कुटुंबीय खंडवाला जाण्यासाठी पुणे रेल्वे स्थानकावर पोहोचले. खंडवाकडे जाण्यासाठी ते प्लॅटफॉर्म क्रमांक ३ वर थांबले होते. दुसऱ्या सकाळी लवकर त्यांची ट्रेन होती.




17 फेब्रुवारी रोजी पहाटे दीड वाजता महिलेचा पती स्वच्छतागृहाकडे जात असताना त्याला चार वर्षांची मुलगी दिसली नाही. त्यांनी शोधाशोध केली असता ती सापडलीच नाही. पहाटे तीनच्या सुमारास त्यांनी रेल्वे पोलिसांत धाव घेतली. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास केला असता लाल रंगाचा टी-शर्ट व अर्धी पॅन्ट घातलेला एक तरुण मुलीचा हात धरून तिला घेऊन जाताना दिसला. नराधम तरुणासोबत जाताना मुलीने प्रतिकार केला नव्हता त्यावरुन तो पीडितेच्या ओळखीचा असावा हे स्पष्ट झाले. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज मुलीच्या पालकांना दाखवताच त्यांनी नराधमाला ओळखले.

नराधम तरुण हा ट्रेन प्रवासात पीडित मुलीच्या कुटुंबियांच्या शेजारीच बसला होता, अशी माहिती समोर आली. एकीकडे पोलीस पुण्यातील बुधवार पेठ आणि इतर भागातील बांधकाम साईटवर कसून शोधमोहीम राबवत असतानाच दुसरीकडे सकाळी साडे पाचच्या सुमारास नराधम महेश हा पीडित चिमुकलीला घेऊन रेल्वे स्थानकात पोहोचल्याचे लक्षात आले. गस्त घालणाऱ्या पोलिसांनी लगेच संशयिताला ताब्यात घेत चिमुकलीची सुटका केली.

### खाऊ देण्याच्या बहाण्याने नेले

महेशने चिमुकलीला खाऊ देण्याच्या बहाण्याने रेल्वे स्थानकाबाहेर नेले. यानंतर निर्जनस्थळी नेत त्याने आक्षेपार्ह वर्तन केले, अशी माहिती चिमुकलीने महिला पोलिसांना दिली. मुलीच्या कपड्यांवरील रक्ताचे डाग, पोटदुखीची तक्रार यावरुन पोलिसांना संशय बळावला. वैद्यकीय तपासणीत चिमुकलीवर अत्याचार झाल्याचे उघडकीस आले असून पोलिसांनी महेशला अटक केली आहे. महेश हा मूळचा मध्य प्रदेशमधील बालाघाटचा रहिवासी आहे. भारतीय न्याय संहिता कलम १३७(२), ६५(२) तसेच POCSO कायद्याच्या कलम ४ व ६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# बुलेट चालकांविरुद्ध पोलिसांची कारवाई; ३४८ सायलेंसर जप्त

**महाईन्यूज । पुणे**

**सायलेंन्सरमध्ये फेरफार करुन फटाक्यांसारखे आवाज काढणाऱ्या बुलेट चालकांविरुद्ध वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला. पोलिसांनी शहराच्या वेगवेगळ्या भागात ३४८ बुलेट चालकांविरुद्ध कारवाई केली. त्यांच्या बुलेटला बसविण्यात आलेले सायलेन्सर जप्त करण्यात आले, पोलिसांनी बुलेट चालकांसह नियमभंग करणाऱ्या दुचाकी चालकांविरुद्ध कारवाई केली. त्यांच्याकडून १९ लाखांचा दंड वसूल करण्यात आला.**




शहराच्या वेगवेगळ्या भागात विशेषत: उपनगरात भरधाव वेगात बुलेट चालक जातात. काही बुलेट चालक सायलेंन्सरमध्ये फेरफार (मॉडीफाय) करतात. अशा प्रकारचे फेरफार केल्यानंतर सायलेन्सरमधून फटाक्यासारखे आवाज येतात. रात्री अपरात्री अशा प्रकाराच्या आवाजाचा नागरिकांना त्रास होतो. विशेषत : ज्येष्ठ नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागते. वाहतूक पोलिसांकडून आठवडभरापासून बेशिस्त वाहनचालकांविरुद्ध कारवाई सुरू करण्यात आली. विरुद्ध दिशेने जाणे, ट्रिपल सीट, तसेच विविध प्रकारचे नियमभंग करणाऱ्या दुचाकीस्वारांविरूद्ध कारवाई करण्यात आली आहे. बेशिस्त दुचाकीस्वारांकडून एक कोटी रुपयांहून जास्त रक्कम दंडापोटी वसूल करण्यात आली आहे.

वाहतूक पोलिसांनी शुक्रवारी सायलेन्सरमध्ये फेरफार करुन फटाक्यासारखे आवाज काढणाऱ्या बुलेट चालकांविरुद्ध कारवाई केली. पोलिसांनी दिवसभरात ३४८ बुलेट चालकांविरुद्ध कारवाई करुन सायलेंन्सर जागेवरच काढून टाकले. वाहतूक पोलिसांनी हे सायलेन्सर जप्त केले. बुलेट चालकांकडून तीन लाख ३४ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. बेशिस्त दुचाकीस्वारांविरुद्ध कारवाई करण्यात आली असून, पोलिसांनी १४८ दुचाकी जप्त केल्या. पोलिसांनी नियमभंग करणाऱ्या वाहन चालकांकडून १५ लाख ७३ हजार रुपयांचा दंड वसूल केला. वाहनचालकांनी नियमांचे पालन करावे, असे आवाहन वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त हिंमत जाधव यांनी केले आहे.

### मद्यपी वाहनचालकां विरुद्ध कारवाई

वाहतूक पोलिसांनी मद्य प्राशन करुन वाहने चालविणाऱ्यांविरुद्ध कारवाई केली. वाहतूक पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करुन ५३ मद्यपी वाहन चालकांविरुद्ध न्यायालयात खटले दाखल केले. या प्रकरणात कारवाई करण्यात आलेल्या ४४ आरोपींना न्यायालयाने चार लाख २९ हजार ५०० रुपयांचा दंड ठोठावला असून, त्यांच्याकडून त्वरीत दंड वसूल करण्यात आला आहे, अशी माहिती वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त हिंमत जाधव यांनी दिली.

# डांबरीकरण रखडल्याने श्वसनाचे आजार वाढले; महापालिकेवर निष्क्रियतेचा आरोप

## रस्ते अर्धवट, परिसर धुळीत; कुदळवाडीत नागरिकांचा संताप उसळला

**महाईन्यूज ।** पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने मागील वर्षी कुदळवाडी येथील अतिक्रमणांवर मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात आली. त्यानंतर येथील डीपी रस्ते विकसित करण्याचे काम हाती घेण्यात आले; परंतु अद्याप येथील रस्ते पूर्ण न झाल्याने येथील नागरिकांना तसेच वाहनचालक व व्यावसायिकांनी मोठ्या प्रमाणावर समस्यांचा सामना करावा लागत आहे. रस्त्यावर डांबरीकरण न केल्याने मोठ्या प्रमाणावर धुळीचे साम्राज्य पसरले आहे.**



कुदळवाडी येथील मोरे पाटील चौक ते चिखली-मोशी मार्गाला जोडणारा रस्ता बालघरे वस्ती, विसावा चौकातून हा मार्ग जातो. या मार्गाचे काम अत्यंत संथगतीने सुरू आहे. यामुळे मागील एक वर्षापासून येथील नागरिकांना विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे. रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी खडी टाकण्यात आलेली आहे. त्यावर त्यावर कुठे कच तर कुठे बारीक खडी टाकून रस्ता ठिकठिकाणी तयार केला आहे. परंतु रस्त्यावर डांबरीकरण न केल्याने चारचाकी, अवजड वाहने तसेच इतर मालवाहतूक करणारे वाहने या रस्त्याने गेल्यानंतर मोठ्या प्रमाणात धूळ उडत आहे. यामुळे आजूबाजूचे व्यावसायिक, रहिवासी तसेच पादचारी यांना धुळीचा सामना करावा लागत आहे.

या भागात मोठ्या प्रमाणावर कामगार वर्ग वास्तव्यास आहे. यामुळे पादचारी नागरिकांची संख्या जास्त आहे. त्यांना रस्त्याने प्रवास करताना धुळीचा मोठ्या प्रमाणावर सामना करावा लागत आहे. बारीक धूळ व मातीचे कण नागरिकांच्या डोळ्यात जात असल्याने त्रास सहन करावा लागत आहे. सर्वसामान्य नागरिकांना डोळ्याच्या रुग्णालयात जाण्याची वेळ येत आहे. डोळे चेक करण्यासाठी साधारण 300 ते 500 रुपये फी देऊन नंतर ड्रॉप, गोळ्या घेण्याची वेळ येत आहे. तसेच त्या दिवशी कामाला दांडी पडत आहे. यामुळे येथील रस्त्याचा विकास नागरिकांची डोकेदुखी ठरत आहे.

### रस्त्यावर पाणी मारण्याची गरज

रस्त्याचे काम करताना जोपर्यंत डांबरीकरण होत नाही, तोपर्यंत रस्त्यातील धूळ उडून नागरिकांना त्रास होणार नाही, याची काळजी संबंधित ठेकेदाराने घेणे गरजेचे आहे. मागील वर्षापासून रस्त्याचे काम सुरू आहे; परंतु अद्याप एकही दिवस धूळ उडू नये यासाठी ठेकेदार उपाययोजना करताना दिसून येत नाही. याकडे महापालिकेचा संबंधित विभाग देखील दुर्लक्ष करत असल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. एकीकडे महापालिका प्रदूषण व हवेतील धुलीकणांचे प्रमाण कमी करण्यासाठी महापालिकेने कोट्यवधी रुपये खर्च करून रस्त्यावर पाणी मारण्याचे काम करत आहे. तर दुसरीकडे दिवसरात्र कुदळवाडीतील नागरिक धुळीचा सामना करत आहेत. याकडे प्रशासन दुर्लक्ष करत आहे.

> “ महापालिकेने शहराची हवा शुद्ध राहण्यासाठी लाखो रुपये खर्च करत आहे. परंतु, कुदळवाडीत देखील नागरिक राहत आहेत. टॅक्स भरत आहेत. त्यांनादेखील शुद्ध हवेची गरज आहे. परंतु प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असल्याने आम्हाला रस्त्याने प्रवास करणे देखील कठीण झाले आहे. घराची दारे, खिडक्या बंद करून बसण्याची वेळ आली आहे. धुळीने घरात राहत आहे की मातीत, अशी आमची अवस्था झाली आहे. तरी संबंधित रस्त्याचे लवकरात लवकर डांबरीकरण करावे. डांबरीकरण होईपर्यंत धूळ उडणार नाही, याची व्यवस्था करावी.
>
> - स्थानिक नागरिक.

# बनावट आरटीओ लिंकचा सापळा; वाहनधारकांना सतर्कतेचा इशारा

**महाईन्यूज ।** पिंपरी-चिंचवड

**वाहन चालविण्याचा परवाना, वाहन नोंदणी, ई-चलन आदी सेवांशी संबंधित बनावट संकेतस्थळे, फसवे मोबाइल ॲप्स (APKS) तसेच एसएमएस आणि व्हॉट्सॲपद्वारे पाठवल्या जाणाऱ्या खोट्या लिंकच्या माध्यमातून आर्थिक फसवणुकीचे प्रकार वाढत असल्याचे समोर आले आहे. या प्रकारांमुळे वाहनचालक व वाहनमालकांची वैयक्तिक माहिती चोरीला जाण्याबरोबरच ओळखीचाही गैरवापर होत आहे.**




नागरिकांना सुविधा मिळाव्यात यासाठी परिवहन विभागाने बहुतेक सेवा ऑनलाइन केल्या असून काही सेवा 'फेसलेस' पद्धतीने घरबसल्या करता येतात. लायसन्स नूतनीकरण, नाव व पत्ता बदल, जन्मतारीख दुरुस्ती तसेच वाहन हस्तांतरण अशी कामे आधार क्रमांकाच्या साहाय्याने ऑनलाइन पूर्ण करता येतात. मात्र याचाच गैरफायदा घेत सायबर गुन्हेगार नागरिकांना “आपल्या वाहनाचे चलन बाकी असून त्वरित दंड भरा” किंवा “लायसन्स सस्पेंड होणार आहे, तात्काळ तपासणी करा” असे संदेश पाठवून बनावट लिंकवर क्लिक करण्यास भाग पाडतात आणि आर्थिक फसवणूक करतात.

परिवहन विभागाने स्पष्ट केले आहे की, आरटीओ किंवा विभागाकडून नागरिकांना कधीही व्हॉट्सॲप किंवा इतर मोबाइल ॲपद्वारे पेमेंट लिंक पाठविली जात नाही. विभागाची सर्व अधिकृत संकेतस्थळे '.GOV.IN' या डोमेनवरच संपतात. त्यामुळे '.COM', '.ONLINE', '.SITE' किंवा इतर डोमेनवरील लिंक उघडू नयेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

संशयास्पद संदेश अथवा लिंक आल्यास नागरिकांनी त्वरित तक्रार नोंदवावी. त्यासाठी राष्ट्रीय सायबर क्राइम पोर्टलवर ऑनलाइन तक्रार करता येते किंवा १९३० या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधता येतो. तसेच जवळच्या सायबर पोलिस ठाण्यातही तक्रार नोंदवण्याची सुविधा उपलब्ध आहे, असे आरटीओ अधिकाऱ्यांनी सांगितले.

नागरिकांनी सावध राहून केवळ अधिकृत संकेतस्थळांचाच वापर करावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

> “ नागरिकांनी सायबर फसवणुकीपासून सावध राहून योग्य ती दक्षता घ्यावी. तसेच या बाबत योग्य माहिती मिळविण्यासाठी संबंधित प्रादेशिक परिवहन कार्यालय किंवा वाहतूक विभागाशी संपर्क साधावा. फसवी माहिती आल्यास प्रशासनाशी संपर्क साधावा.
>
> - शैलेश कामत, परिवहन सहआयुक्त

### या लिंकपासून सावध

'RTO SERVICES.APK', 'MPARIVAHAN_UPDATE.APK', 'ECHALLAN_PAY.APK' अशा अनधिकृत APK ॲप्स, लिंक डाउनलोड करू नयेत. तसे केल्यास त्याद्वारे ओटीपी, बँकिंग माहिती व मोबाइलमधील इतर संवेदनशील माहिती चोरीला जाण्याची शक्यता असते.



## भूमिका

**नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे पार पडलेली 'ग्लोबल एआय समिट' ही चालू वर्षातील सर्वात महत्त्वाची जागतिक घडामोड ठरली आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या नियमन, सुरक्षितता आणि परिणामांच्या संदर्भात जागतिक पातळीवर ठोस चौकट उभी करण्याचा हा प्रयत्न आहे. विशेष म्हणजे ही परिषद 'ग्लोबल साऊथ'मध्ये प्रथमच झाली आणि त्यामुळे तिचे ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित झाले.**

# डिजिटल वसाहतवादाला उत्तर 'एआय फॉर पीपल'

कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे उद्याच्या जगाचे वास्तव. उद्योग, अर्थकारण, कृषी, आरोग्य, शिक्षण, संरक्षण, वाहतूक, दळणवळण, अवकाश संशोधन अशा सर्व क्षेत्रांत एआयमुळे आमूलाग्र बदल घडत आहेत. मात्र या तंत्रज्ञानाचा प्रसार सध्या बेलगाम असा आहे. जागतिक पातळीवर कोणतेही बंधनकारक करार, कन्व्हेन्शन किंवा नियमनाची एकसंध चौकट नाही. इंग्लंड, दक्षिण कोरिया आणि फ्रान्समध्ये झालेल्या पूर्वीच्या परिषदांत सुरक्षा आणि नियमनावर भर होता; परंतु ठोस अंमलबजावणी यंत्रणा आकारास आली नाही. या पार्श्वभूमीवर भारतातील 'एआय इम्पॅक्ट परिषद' परिणामकेंद्री दृष्टीकोन मांडणारी ठरली. भारतामध्ये सुमारे २० देशांचे प्रमुख सहभागी झाले. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युअल मॅक्रॉन, ब्राझीलचे राष्ट्राध्यक्ष लुला यांच्यासह अनेक देशांचे प्रतिनिधी उपस्थित होते. कॉर्पोरेट विश्वातील सुंदर पिचाई, सत्या नडेला, बिल गेट्स यांसारखे दिग्गजही सहभागी झाले. ही परिषद केवळ नियमनापुरती मर्यादित न राहता 'एआयचा लोकांवर आणि पृथ्वीवर होणारा परिणाम' या व्यापक विषयावर केंद्रित होती. त्यामुळे तिचा व्याप्तीगत विस्तार लक्षणीय ठरला.




भारताची एआय क्षमतांची झेप : स्टॅनफोर्डच्या ताज्या अहवालानुसार 'एआय व्हायब्रन्सी इंडेक्स'मध्ये अमेरिका प्रथम, चीन द्वितीय आणि भारत तृतीय क्रमांकावर आहे. ॲप्लिकेशन, मॉडेल, एनर्जी, चीप आणि इन्फ्रास्ट्रक्चर या पाचही स्तरांवर भारताने प्रगती साधली आहे. भारत आता एआय पेनिट्रेशनमध्ये 'टीअर-१' गटात सहभागी झाला आहे.

१७५ अब्ज डॉलर खर्चुन विशाखापट्टणम येथे 'एआय सिटी' उभारण्याची योजना आहे. 'किसान मित्र' ॲप व 'भाषिणी'सारख्या उपक्रमांमुळे तंत्रज्ञानाचा लाभसर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न सुरू आहे. या घडीला 'एआय'चे लोकशाहीकरण आवश्यक : जगात 'डिजिटल डिव्हायडेशन' प्रकर्षाने जाणवते. अमेरिका, युरोप आणि चीनकडे डेटासेट व कॉम्प्युटिंग संसाधनांची मक्तेदारी आहे. या पार्श्वभूमीवर 'एआय'चे लोकशाहीकरण आवश्यक आहे. भारताने 'एआय फॉर पीपल, एआय फॉर प्लॅनेट, एआय फॉर प्रोग्रेस' ही उद्दिष्टे मांडली. स्थानिक भाषा, सर्वसमावेशकता, डेटाबेस आणि मूलभूत गरजांवर उपाययोजना यावर परिषदेत भर देण्यात आला.

परिषद ऐतिहासिक का?

पूर्वीच्या परिषदांत 'एआय'ची १ सुरक्षा आणि नियमनावर भर होता; मात्र दिल्लीतील परिषद परिणाम, सर्वसमावेशकता आणि विकासाभिमुख वापरावर केंद्रित होती.

५०० हून अधिक भाषणांमधून एआय साक्षरता वाढवण्याचा प्रयत्न झाला. जनतेच्या मूलभूत गरजांसाठी एआय कसा उपयोगी ठरू शकतो, यावर ठोस विचारमंथन झाले. त्यामुळेच ही परिषद गुणात्मक दृष्ट्या ऐतिहासिक ठरते.

## प्रासंगिक »

### खरे दुःख

***एका सोनाराच्या दुकानासमोरच एका लोहाराचे दुकान होते. सोनार काम करताना हलका, मंद आवाज होत असे; पण लोहार लोखंड ठोकताना मोठा कर्णकर्कश आवाज करत असे.***

एके दिवशी सोनाराच्या दुकानातील एक छोटासा सोन्याचा कण लोहाराच्या दुकानात येऊन पडला. तिथे त्याची एका लोखंडाच्या कणाशी ओळख झाली आणि दोघे गप्पा मारू लागले.

सोन्याचा कण म्हणाला, "आपलं दुःख तर सारखंच आहे. दोघांनाही आगीत तापवतात आणि हातोड्याने ठोकतात. मी ते शांतपणे सहन करतो, पण तू इतका खिन्न का दिसतोस?"

लोखंडाचा कण दुःखी स्वरात म्हणाला, "हो, आग तीच आणि मारही तसाच; पण फरक इतकाच — तुला ठोकणारा हातोडा परका आहे, तर मला ठोकणारा लोखंडाचा हातोडा माझ्याच धातूचा, म्हणजे माझाच भाऊ आहे. म्हणून त्याची वेदना अधिक खोल जाते."

तात्पर्य- परक्याने दिलेल्या दुखापेक्षा आपल्या माणसांनी दिलेला त्रास मनाला जास्त लागतो.

जागतिक अर्थकारणात वेगाने होत असलेल्या बदलांमुळे व्यापार धोरणे केवळ आयात-निर्यातीपुरती मर्यादित राहिलेली नाहीत. ती आता उत्पादनरचना, रोजगारनिर्मिती, संसाधनांचे वाटप आणि सामाजिक समतेवर थेट परिणाम घडवतात.

# अमेरिकेशी जकात करार : संधी की सावधानता हवी?



त्यामुळे भारत-अमेरिका २०२६ अंतरिम व्यापार कराराकडे व्यापक आर्थिक आणि सामाजिक दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक ठरते. या करारानुसार अमेरिकेने भारतीय वस्तूंवरील आयातशुल्क सुमारे १८ टक्क्यांपर्यंत कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याबदल्यात भारताने अमेरिकन वस्तूंवर शून्य करदर आणि नॉन-टॅरिफ अडथळ्यांमध्ये शिथिलता मान्य केली आहे. कराराचा सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे 'मिशन ५००'. पुढील पाच वर्षांत ऊर्जा, तंत्रज्ञान, संरक्षण, शेती आणि मूल्यसाखळी क्षेत्रांत भारताने सुमारे ५०० अब्ज डॉलरची अमेरिकन खरेदी करण्याचे उद्दिष्ट स्वीकारले आहे. त्यामुळे कृषी, उद्योग आणि सेवा क्षेत्रांवर दूरगामी परिणाम अपेक्षित आहेत. कराराचे यश अंमलबजावणी क्षमता, गुणवत्तानियंत्रण, पारदर्शक आयात धोरण आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी पूरक उपायांवर अवलंबून राहील.

निर्याताभिमुखतेच्या दृष्टीने मसाले, फळे, ड्रायफ्रुट्स, प्रक्रिया अन्न, पेये, चहा-कॉफी या क्षेत्रांतून सुमारे ११.६ टक्के रोजगार निर्माण होतो. अमेरिकन बाजारपेठेतील प्रवेश सुलभ झाल्यास मूल्यवर्धित शेती, सूक्ष्म-लघु उद्योग, ॲग्रो-प्रोसेसिंग, पॅकेजिंग, कोल्ड-चेन आणि निर्यात सेवांना चालना मिळू शकते. मात्र या प्रक्रियेचा फायदा मध्यम व मोठ्या शेतकऱ्यांकडे झुकण्याची शक्यता आहे, त्यामुळे असमतोल वाढू शकतो. शेती व पशुधन क्षेत्रातही मिश्र परिणाम दिसू शकतात. भारताची मोठी लोकसंख्या शेतीवर अवलंबून असून हवामान बदल, बाजारातील चढउतार आणि वाढता खर्च यामुळे शेतकरी आधीच अडचणीत आहेत. उच्च तंत्रज्ञानाधारित अमेरिकन कृषी व्यवस्थेशी किंमत स्पर्धा स्थानिक उत्पादकांसाठी कठीण ठरू शकते. भारताने गहू, तांदूळ, दूध व पोल्ट्रीवर सवलत न देण्याची भूमिका घेतली असली तरी सोयाबीन तेल व डीडीजी आयात चिंतेची बाब आहे. स्वस्त तेलामुळे तेलबिया उत्पादकांवर दबाव येईल, तर डीडीजीमुळे दुग्ध व पोल्ट्री उद्योगाला फायदा होऊन मका व चारा उत्पादकांना फटका बसू शकतो. एकूणच हा करार संधी आणि सावधगिरी दोन्हींचा आहे. योग्य नियमन, बाजार सुधारणा आणि शेतकरी-केंद्रित धोरणे राबवली तर तो भारतासाठी विकासाची नवी दिशा ठरू शकतो.

## ।। अभंगवाणी ।।



वाळो जन मज म्हणोत शिंदळी ।
परि हा वनमाळी न विसंबें ॥१॥

सांडूनि लौकिक जालियें उदास ।
नाहीं भय आस जीवित्वाची ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला विरोधक आक्रमक!

## पाच मुद्यांवरून विरोधक आक्रमक; सरकारच्या चहापानावर बहिष्कार

**महाईन्यूज । मुंबई**

**अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला महाविकास आघाडीची पत्रकार परिषद पार पडली. या पत्रकार परिषदेतून विरोधकांनी राज्य सरकारवर विविध मुद्यांवरून जोरदार टीका केली. मंत्री झिरवाळांचा राजीनामा घ्या, अशी मागणी करत घटनात्मक पदावर बसलेल्या विधानसभा अध्यक्षांचं वर्तन घटनाबाह्य, अजित पवारांचा अपघात की घातपात?, शक्तिपीठ महामार्ग, अशा विविध मुद्यांवरून विरोधक आक्रमक झाले आहेत.**




राज्य सरकारच्या चहापानावर बहिष्कार टाकल्याचंही विरोधकांनी सांगितलं आहे. या पत्रकार परिषदेत भास्कर जाधव, सतेज पाटील, आदित्य ठाकरे, अनिल परब, अजय चौधरी, सुनील प्रभू यांच्यासह आदी नेते उपस्थित होते. यावेळी मंत्री झिरवाळांच्या राजीनाम्याच्या मुद्यांवरून विरोधक आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले.

“मंत्रालयात थेट लक्ष्मीदर्शन सुरू असून एसीबीने धाड टाकली. मंत्री झिरवाळ यांच्या कार्यालयातील लिपिकाला लाच घेताना अटक करण्यात आली आणि अजूनही मंत्र्यांचा राजीनामा घेण्यात आलेला नाही. राज्यात उच्चपदस्थ मंत्र्यांच्या जवळच्या व्यक्तीच्या ड्रग फॅक्टरीवर पोलिसांनी धाड टाकली, पण त्यांच्यावर कारवाई झालेली नाही. मंत्री संजय शिरसाट, योगेश कदम यांच्याविरोधात पुरावे देऊन देखील सरकार कारवाई करत नसल्याने त्यांच्या चहापानावर आम्ही बहिष्कार टाकत आहोत”, असं भास्कर जाधव यांनी म्हटलं.

राज्यात वीजदर कमी करण्याचं मुख्यमंत्री फडणवीस यांनी जाहीर केलं होतं. पण महावितरणने वीजदरवाढीचा प्रस्ताव दिलेला आहे. जनतेची ही फसवणूक असल्याची टीका शिवसेना (ठाकरे) पक्षाचे गटनेते भास्कर जाधव यांनी केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वतःला इन्फ्रामॅन म्हणून स्वतःचे मार्केटिंग करत आहेत, पण मुलुंड मध्ये मेट्रोमधील स्लॅब कोसळून एकाचा मृत्यू झाला. एमएमआरडीने बांधलेला पूल हा आठवे आश्चर्य मानावे लागेल. शहरात लोकांनी जगायचे कसे? रस्त्यावर चालताना मृत्यू, दुसरीकडे विधानसभा अध्यक्षांची दादागिरी सुरू आहे. महायुतीचे बहुमताचे सरकार असूनही त्यांना विरोधी पक्षाची भीती का?, असा सवाल आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला.

शक्तिपीठ महामार्गावर आम्ही आक्षेप घेतला. या महामार्गाला शेतकऱ्यांनी स्पष्ट विरोध केला तरी जमीन मोजणीचे काम सरकारने सुरू केले आहे. परभणी इथे तर शेतकऱ्यांना मारहाण करण्यात आली. त्यामुळे हा महामार्ग कंत्राटदारासाठी शेतकऱ्यांवर थोपवला जात असल्याचा गंभीर आरोप सतेज पाटील यांनी केला. मंत्रालयात मंत्री झिरवळ यांच्या कार्यालयात एसीबी धाड टाकते, हे मुख्यमंत्र्यांच्या परवानगी शिवाय होऊ शकत नाही. एसीबी इतके स्वतंत्रपणे काम करत असेल तर आम्ही त्यांचा सत्कार करू असा टोला सतेज पाटील यांनी लगावला.

### अजितदादांचा अपघात की घातपात?

राज्याचे विद्यमान उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमान अपघातात मृत्यू झाला. शासनाने फक्त दोन ओळींचं स्पष्टीकरण दिलं जातं की अपघातावर कुणीही प्रश्न निर्माण करु नये. का करु नये? हा घातपात आहे की अपघात आहे? याची देशभरात चर्चा सुरु आहे. अशा वेळी आम्ही अधिवेशनाच्या आदल्या दिवशी होणाऱ्या चहापानाला का जायचं? असं विजय वडेट्टीवार यांनी म्हटलं आहे.

## मुंबई-विजयदुर्ग रो-रो फेरी १ मार्चपासून सुरू; जलवाहतुकीचा नवा अध्याय

**महाईन्यूज । सावंतवाडी**

**सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या विकासाला गती देणारा मुंबई-विजयदुर्ग हा जलमार्ग अखेर १ मार्चपासून सुरू होत आहे. कोकणवासीयांसाठी हा प्रवास अधिक सोयीस्कर, जलद आणि आरामदायी होणार असून, या सेवेच्या पहिल्या प्रवासात सिंधुदुर्गचे पालकमंत्री नितेश राणे स्वतः सहभागी होणार आहेत. १ मार्च रोजी ते प्रवाशांसोबत एम२एम फेरीतून मुंबई ते विजयदुर्ग असा प्रवास करतील.**




कोकणात जाणाऱ्या प्रवाशांना आतापर्यंत कोकण रेल्वे,रस्ते मार्गावर अवलंबून राहावे लागत होते. मात्र, या रो-रो फेरीमुळे रस्ते वाहतुकीवरील ताण कमी होणार असून प्रवाशांचा वेळ आणि खर्च दोन्ही वाचणार आहेत. विशेषतः मुंबईतील चाकरमान्यांसाठी आणि पर्यटकांसाठी हा प्रवास सुखद ठरणार आहे. ही सेवा मुळात गणेशोत्सवाच्या काळात सुरू होणे अपेक्षित होते, मात्र आता १ मार्चपासून ती पूर्ण क्षमतेने सुरू होत आहे.

प्रवाशांनी प्रवासाच्या प्रस्थान वेळेच्या किमान ९० मिनिटे आधी बंदरावर उपस्थित राहणे बंधनकारक आहे. तसेच, समुद्रामधील हवामान आणि तांत्रिक कारणांनुसार वेळापत्रकात आयत्या वेळी बदल होऊ शकतो, याची नोंद प्रवाशांनी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

या जलवाहतुकीमुळे कोकणातील पर्यटन, व्यापार आणि स्थानिक रोजगाराला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा स्थानिक नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

### असे असेल वेळापत्रक:

नवीन वेळापत्रकानुसार, १ मार्च रोजी सकाळी ८ वाजता ही फेरी मुंबईहून सुटेल आणि दुपारी ३ वाजता विजयदुर्ग येथे पोहोचेल. तर परतीचा प्रवास दुपारी १२ वाजता विजयदुर्गहून सुरू होऊन सायंकाळी ७ वाजता मुंबईत संपेल. मार्च महिन्यात ही सेवा ठराविक दिवशी उपलब्ध राहणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# पाकिस्तानचा अफगाणिस्तानवर 'एअर स्ट्राईक'

## दहशतवादी तळांना लक्ष्य; एकाच कुटुंबातील १७ जणांचा मृत्यू

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**पाकिस्तानच्या सीमेला लागून असलेल्या अफगाणिस्तान प्रांतांमध्ये पाकिस्तानी लष्कराने अतिरेक्यांच्या अड्डयांवर रविवारी हवाई हल्ले केले. यामुळे महिला आणि मुलांसह डझनभर लोक ठार झाले, असं अफगाण अधिकाऱ्यांनी सांगितलं. अधिकाऱ्यांनी नेमके जीवितहानी झाल्याचा आकडा दिला नसला तरी, अहवालात असा दावा करण्यात आला आहे की मृतांमध्ये एकाच कुटुंबातील किमान १७ सदस्यांचा समावेश आहे.**



"काल रात्री, पाकिस्तानने नांगरहार आणि पक्तिका प्रांतांमध्ये आमच्या नागरिकांवर बॉम्बहल्ला केला. या हल्ल्यात महिला आणि मुलांसह डझनभर लोक मारले गेले आणि जखमी झाले. पाकिस्तानी जनरल अशा गुन्ह्यांद्वारे त्यांच्या देशाच्या सुरक्षा कमकुवतपणाची भरपाई करतात", असं अफगाणिस्तान सरकारचे प्रवक्ते जबीहुल्लाह मुजाहिद म्हणाले.

अफगाण प्रसारक टोलोन्यूजने अधिकाऱ्यांचा हवाला देत म्हटले आहे की, "पाकिस्तानी सैन्याने प्रांतातील बेहसुद जिल्ह्यात एका नागरिकाच्या घराला लक्ष्य केले, ज्यामुळे कुटुंबातील २३ सदस्य ढिगाऱ्याखाली गाडले गेले. आतापर्यंत फक्त चार जणांना बाहेर काढण्यात आले आहे आणि बचाव कार्य अजूनही सुरू आहे".

दरम्यान, पाकिस्तानने हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. रमजान दरम्यान पाकिस्तानातील बाजौर आणि बन्नू यथे आत्मघातकी हल्ले झाले होते. या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानने अफगाणिस्तानच्या दहशतवादी तळांना लक्ष्य केलं. पाकिस्तानने सीमावर्ती भागात पाकिस्तानी तालिबान आणि त्यांच्याशी संबंधित संघटनांच्या सात दहशतवादी छावण्या आणि लपण्याच्या ठिकाणांना गुप्तचर यंत्रणेच्या आधारे निवडक लक्ष्य केलं.

पाकिस्तानचे माहिती मंत्री अत्ताउल्लाह तरार म्हणाले, "पाकिस्तानने इस्लामिक स्टेट गटाच्या एका संलग्न संघटनेलाही लक्ष्य केले. या संघटनेने इस्लामाबादमधील एका मशिदीवर अलिकडेच झालेल्या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली होती, ज्यामध्ये ३१ लोक मृत्युमुखी पडले होते आणि १६० हून अधिक जखमी झाले होते. २००८ च्या मॅरियट हॉटेल बॉम्बस्फोटानंतर इस्लामाबादवरील हा सर्वात घातक हल्ल्यांपैकी एक होता.

### पाकिस्तान-अफगाणिस्तान संघर्ष

२०२१ मध्ये तालिबानने काबूलवर पुन्हा नियंत्रण मिळवल्यापासून अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमध्ये संघर्ष सुरू झाला आहे. अलिकडच्या काही महिन्यांत झालेल्या प्राणघातक सीमा संघर्षांमुळे दोन्ही देशांमधील संबंध झपाट्याने बिघडले आहेत, पाकिस्तानने अफगाणिस्तानच्या तालिबानवर दहशतवाद्यांना आश्रय देण्यासाठी अफगाणिस्तानच्या भूमीचा वापर करण्यास परवानगी दिल्याचा आरोप केला आहे.

### आम्ही बदला घेणारच

पाकिस्तानच्या सैन्याने पुन्हा एकदा अफगाणिस्तानमध्ये घुसखोरी करत एअर स्ट्राइक केला. रविवारी रात्री नांगरहार आणि पक्तिका प्रांतात निरपराध नागरिकांवर हवाई हल्ले झाले. यामध्ये लहान मुलांसह डझनभर लोकांचा मृत्यू झाला. हे सगळे एकाच कुटुंबातील असल्याची माहिती आहे. पाकिस्तानचं हे कृत्य निषेधार्ह आहे. आम्हा याचा बदला नक्की घेऊ. पाकिस्तानने हवाई सीमेचं उल्लंघन केलं आहे. त्यामुळे अफगाणिस्तानला उत्तरादाखल कारवाई करण्याचा पूर्ण अधिकार आहे. योग्य वेळ आली की आम्ही पाकिस्तानला उत्तर देणारच, असं तालिबान सरकारचे प्रवक्ते जबीउल्लाह मुजाहिद यांनी म्हटलंय.

# जम्मू-काश्मीरमध्ये लष्कराची मोठी कारवाई; २ दहशतवादी ठार

**महाईन्यूज । जम्मू-काश्मीर**

**जम्मू-काश्मीरमधील किश्तवाड जिल्ह्यात लष्कराने मोठी कारवाई केल्याची माहिती समोर आली आहे. किश्तवाडमध्ये रविवारी सुरक्षा दलाचे जवान आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक झाली. या चकमकीत जैशच्या एका कमांडरसह २ दहशतवाद्याचा खात्मा करण्यात आला आहे.**



किश्तवाडमध्ये सुरक्षा दलाच्या जवानांकडून दहशतवादाच्या विरोधात मोठी मोहिम राबवण्यात येत आहे. याच मोहिमेदरम्यान किश्तवाडमधील घनदाट जंगलात दबा धरून बसलेल्या दोन दहशतवाद्यांचा सुरक्षा दलाच्या जवानांनी खात्मा केला आहे. या कारवाईत जैश-ए-मोहम्मदच्या एका टॉप कमांडरसह दोन दहशतवाद्यांना ठार करण्यात जवानांना यश आलं आहे.

भारतीय लष्कराच्या व्हाईट नाईट कॉर्प्सने एका निवेदनात म्हटलं की, "'ऑपरेशन त्राशी १' अंतर्गत जम्मू आणि काश्मीरच्या किश्तवाड जिल्ह्यात जैश-ए-मोहम्मद दहशतवादी संघटनेच्या दोन दहशतवाद्यांना ठार करण्यात आलं आहे. पोलीस आणि इतर गुप्तचर संस्थांकडून मिळालेल्या विश्वासार्ह गुप्त माहितीनंतर जम्मू आणि काश्मीर पोलीस, लष्कर आणि सीआरपीएफच्या पथकांनी ही संयुक्त कारवाई केली आहे."

सुरक्षा दलांनी केलेल्या कारवाईच्या ठिकाणाहून दोन एके-४७ रायफल आणि इतर दारूगोळा जप्त करण्यात आला आहे. दरम्यान, याआधीही लष्कराने सांगितलं होतं की, जिल्ह्यातील चतरू भागात चकमक झाली होती.

अधिकाऱ्यांनी पीटीआयशी बोलताना सांगितलं की, बंदी घातलेल्या जैश-ए-मोहम्मद गटाशी संबंधित दोन पाकिस्तानी दहशतवादी तिथे उपस्थित असल्याची माहिती पथकांना मिळाली होती. डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या एका मातीच्या घरात लपलेल्या दहशतवाद्यांनी सैनिक जवळ येताच गोळीबार केला. त्यानंतर जवानांनी केलेल्या कारवाईत दोन दहशतवाद्यांना ठार करण्यात आलं. अशाच प्रकारे गेल्या महिन्यात चतरू वनपट्ट्यात दहशतवादी आणि सुरक्षा दलांमध्ये जवळपास सहा वेळा गोळीबार झाले होते. ज्यामध्ये एक दहशतवादी मारला गेला होता.

## गेल्या दोन वर्षांपासून प्रेग्नंसी सुरुच..

सोशल मीडियावर अनेकदा सेलिब्रिटींच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल कोणताही आधार नसलेल्या अफवा पसरवल्या जातात, ज्यामुळे त्यांच्या खासगी आयुष्यावर परिणाम होतो. असेच काही काळापासून टीव्ही अभिनेत्री सरगुन मेहता आणि त्यांचे पती रवी दुबी यांच्याबाबत घडत आहे.अलिकडेच रवी दुबे आणि सरगुन मेहता लवकरच आई-बाबा होणार असल्याच्या बातम्या समोर आल्या होत्या. दोघींनीही याबाबत कोणतीही अधिकृत माहिती दिलेली नसताना सातत्याने यावर चर्चा सुरू आहेत. मात्र यावर आता सरगुनने सोशल मिडियावर पोस्ट शेअर करत संताप व्यक्त केला आहे.सरगुनने शनिवारी इन्स्टाग्रामवरील एका पोस्टद्वारे गरोदर असणाऱ्या अफवांना पूर्णविराम दिला. सरगुन मेहताने इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर करत प्रेग्नंसीच्या अफवांना फेटाळलं. त्याचसोबत अशा निराधार अफवा न पसरवण्याचा सल्ला दिला आहे.'तुम्हाला त्या प्रेग्नंसीबद्दल कसं समजलं ज्याबद्दल मला आणि रवीलाच अजून माहीत नाही? आता पुरे झालं...प्लीज असं वाटतंय वृत्तांना आमच्याही आधी आमच्या प्रेग्नंसीबद्दल समजलं होतं, जी प्रेग्नंसी गेल्या दोन वर्षांपासून सुरूच आहे. त्यांच्या मते मी गरोदर आहे. ही तर सर्वाधिक काळ चाललेली प्रेग्नंसी असेल.कृपया शांत राहा आणि कोणताही आधार नसलेल्या बातम्या पसरवणे थांबवा. कोणतीही बातमी पसरवण्यापूर्वी आमच्याशी किंवा आमच्या टीमशी एकदा विचारणे इतके अवघड नाही, जेणेकरून योग्य माहिती समोर येईल," अशा शब्दांत तिने ट्रोलर्सवर राग व्यक्त केला आहे.सरगुनने तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर नाराजी व्यक्त करत लिहिले की, 'ही मुलं कुठे जात आहेत आणि किती लवकर मी त्यांना जन्म देतेय? मी हे प्रश्न विचारायला हवेत का? की गेल्या दोन वर्षांपासून किंवा त्यापेक्षाही अधिक काळापासून प्रेग्नंट आहे? त्यांना माझ्या डॉक्टरांबद्दल माहित आहे का? सलून किंवा कॅफे जाणंही हल्ली प्रेग्नंसीचं लक्षण मानलं जातंय का?' असे सवाल तिने उपस्थित केले आहेत.



## कंगणासोबतच्या वादावर तापसीने केला मोठा खुलासा

बॉलिवूडची प्रतिभावान अभिनेत्री म्हणून तापसी पन्नूकडे पाहिले जाते. सध्या ती अस्सी या चित्रपटामुळे चर्चेत आहे. २० फेब्रुवारीला हा चित्रपट प्रदर्शित झाला असून, प्रेक्षकांकडून उस्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शक थप्पडफेम दिग्दर्शक अनुभव सिन्हा यांनी केले आहे. चित्रपटाची कथा महिलांवरील होणाऱ्या अत्याचाराला वाचा फोडणारी आहे. हा चित्रपट कोर्टरुम ड्रामा आहे. अभिनेत्री तापसीने पुन्हा एकदा या चित्रपटातून आव्हानात्मक भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे. चित्रपटाच्या निमित्ताने ती विविध ठिकाणी मुलाखत देत असून, अशाच एका मुलाखतीत तापसीने कंगणा राणौत वादावर विचारलेल्या प्रश्नावर अत्यंत संयतपणे उत्तर दिले आहे. खरंतर तापसी पन्नू आणि कंगणा राणौत या दोन बॉलीवूडील प्रसिद्ध अभिनेत्री आहेत. या अभिनेत्रींनी स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. दोघीही त्यांच्या दमदार अभिनयासाठी चर्चेत असतात. मात्र, दोघींमध्ये वाद असल्याच्या चर्चा सतत होतात. यावर तापसीने खुलासा करत तिची बाजू मांडली आहे. तापसी म्हणाली, तिच्याकडून कोणताही संघर्ष किंवा वैर नाही. शिवाय ती कंगणाला तिच्यापेक्षा वरिष्ठ मानते आणि तिच्याशी मैत्री करण्यासही तयार आहे. कंगणाच्या बहिणीने तिला "स्वस्त कॉपी", "बी-ग्रेड अभिनेत्री" आणि "शी-मॅन" अशा प्रकाराचे हिणवणारे विधान केले होते. त्यानंतर दोघेहीमध्ये वाद सुरू झाल्याचे सांगितले जाते. वादावर भाष्य करताना तापसी म्हणाली, "मला माहित नाही की मी कधी भांडले आहे की नाही. जेव्हा दोन लोक एकमेकांशी भांडतात तेव्हा भांडण होते. मी कधीच तसे केले नाही." असा खुलासा तिने केला. पुढे बोलताना तापसी म्हणाली, "मला सांगा, मी कधी तिच्याविरुद्ध एकही शब्द बोललो आहे का? जिथे मी तिच्याविरुद्ध काही बोलले आहे ते मला दाखवा, " असे आव्हान तिने दिले.



## श्रद्धा कपूरने घेतलं अंबाबाईचं दर्शन!

बॉलिवूड अभिनेत्री SHRADDHA KAPOOR सध्या 'ईठा' या तिच्या आगामी आणि बहुचर्चित चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी कोल्हापुरात दाखल झाली आहे. शूटिंगच्या व्यग्र वेळापत्रकातून थोडा वेळ काढत तिने करवीरनिवासिनी अंबाबाई मंदिरात जाऊन देवीचे मनोभावे आणि श्रद्धेने दर्शन घेतले. तिच्या कोल्हापूर आगमनाची माहिती चाहत्यांना मिळताच मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर गर्दी उसळली. अनेक चाहत्यांनी तिची एक झलक पाहण्यासाठी मंदिरात हजेरी लावली. श्रद्धाने अत्यंत शांत आणि संयमी पद्धतीने दर्शन घेतले तसेच हात हलवून उपस्थित चाहत्यांचे अभिवादन केले. तिचे मंदिरातील फोटो आणि व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून चाहत्यांकडून त्यांना मोठी पसंती मिळत आहे.'ईठा' या चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यस्त असतानाही श्रद्धाने अंबाबाईचे दर्शन घेतल्यामुळे तिच्या धार्मिक श्रद्धेचीही चर्चा रंगली आहे. यावेळी तिच्यासोबत या चित्रपटातील प्रमुख अभिनेता RANDEEP HOODA देखील उपस्थित होता. दोघांचे कोल्हापुरातील काही व्हिडिओ आणि छायाचित्रे सोशल मीडियावर वेगाने पसरत असून चाहत्यांमध्ये उत्सुकता वाढवित आहेत.या चित्रपटाचे दिग्दर्शन 'छावा' या चित्रपटाचे दिग्दर्शक LAXMAN UTEKAR करत आहेत. 'ईठा'मध्ये श्रद्धा कपूर मुख्य भूमिकेत झळकणार असून ती विठाबाई नारायणगावकर यांची प्रभावी भूमिका साकारणार आहे. विठाबाई यांच्या आयुष्यावर आधारित ही कथा असल्याने चित्रपटाला विशेष ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व प्राप्त झाले आहे. काही दिवसांपूर्वी या चित्रपटाचे चित्रीकरण कोल्हापुरातील विविध ऐतिहासिक आणि महत्त्वाच्या ठिकाणी पार पडले होते.दरम्यान, अंबाबाईच्या दर्शनावेळी श्रद्धाच्या हातात पारंपरिक खण-नारळाची ओटी होती. तिने भक्तिभावाने देवीच्या चरणी ओटी अर्पण करून पूजा केली. या प्रसंगी मराठी अभिनेता ANAND KALE देखील उपस्थित होता. आनंद काळे यांनी 'संभाजी' मालिकेत कोंडाजी फर्जदची भूमिका साकारली होती, ज्यामुळे ते प्रेक्षकांमध्ये विशेष ओळखले जातात. दर्शनासाठी श्रद्धाने पीच रंगाचा साधा आणि आकर्षक सूट परिधान केला होता. तिचा साधा, पारंपरिक आणि देखणा लूक पाहण्यासाठी चाहत्यांनी मोठी गर्दी केली होती. तिने हसतमुखाने हात उंचावून चाहत्यांचे अभिवादन केले, ज्यामुळे वातावरणात उत्साहाची लहर निर्माण झाली.दरम्यान, काही दिवसांपूर्वी पायाला दुखापत झाल्यामुळे श्रद्धाने चित्रपटाच्या चित्रीकरणातून थोडा ब्रेक घेतला होता. मात्र प्रकृतीत सुधारणा झाल्यानंतर ती पुन्हा जोमाने सेटवर परतली आहे. सध्या 'ईठा' चित्रपटाचे चित्रीकरण अंतिम टप्प्यात असून काम वेगाने सुरू आहे.



# भारत विजेता! कर्णधार राधा यादव ची कमाल!

## बांगलादेशचा पराभव करत रायझिंग स्टार्सचं जेतेपद पटकावलं

**महाईन्यूज । बँकॉक**

**राधा यादवच्या नेतृत्त्वाखाली भारताच्या अ महिला संघाने महिला आशिया चषक रायझिंग स्टार्स २०२६ स्पर्धेचं जेतेपद आपल्या नावे केला. अंतिम सामन्यात टीम इंडियाने बांगलादेश अ संघाचा पराभव करत ४६ धावांनी सामना आपल्या नावे केला. टीम इंडियाने सांघिक कामगिरीच्या बळावर या स्पर्धेचं जेतेपद आपल्या नावे केलं. कर्णधार राधा यादवने संपूर्ण स्पर्धेत संघाचं उत्तम नेतृत्त्व करत जेतेपददेखील पटकावलं आहे.**







बँकॉकमध्ये झालेल्या या सामन्यात टीम इंडियाने प्रथम फलंदाजी करताना तेजल हसबनीस व राधा यादव यांच्या भागीदारीच्या बळावर १३४ धावांचा डोंगर उभारला. तर प्रत्युत्तरात टीम इंडियाच्या कमालीच्या गोलंदाजीच्या बळावर बांगलादेश अ संघाला अवघ्या ८८ धावांवर सर्वबाद करत २०व्या षटकात विजय मिळवला. स्पर्धेतील पहिल्याच सामन्यात युएईविरूद्ध पराभूत झाल्यानंतर टीम इंडियाने या स्पर्धेत मागे वळून न पाहता थेट जेतेपद पटकावलं आहे.

भारताने दिलेल्या १३५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना बागंलादेश संघालाही टीम इंडियाने धक्के दिले. साईमा ठाकोर व प्रेमा रावत यांनी उत्कृष्ट गोलंदाजी केली. शमिमा सुल्ताना हिने २० धावांचं योगदान दिलं. याशिवाय कोणतीच फलंदाज २० धावाही करू शकली नाही. भारताच्या गोलंदाजांनी पुन्हा एकदा उत्कृष्ट कामगिरी केली. या सामन्यात प्रेमा रावतने ३ विकेट्स घेतल्या. तर सोनिया मेंदिया व तनुजा कंवर यांनी २-२ विकेट्स तर सायमा ठाकोर, मिन्नू मणी व कर्णधार राधा यादव यांनी प्रत्येकी १-१ विकेट्स घेतल्या. यासह बांगलादेशचा संघ ८८ धावांवर सर्वबाद करत स्पर्धेचं जेतेपद पटकावलं.

भारत अ संघाने या सामन्याची नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. यादरम्यान टीम इंडियाची सुरूवात फारशी चांगली झाली नाही. ४४ धावांत संघाने ४ विकेट्स गमावल्या होत्या. यानंतर तेजल हसबनीस व कर्णधार राधा यादव यांनी ५० चेंडूत ६९ धावांची भागीदारी रचली. जी सामन्याचा टर्निंग पॉईंट ठरली. तेजल हसबनीसने ३४ चेंडूत ३ चौकार व २ षटकारांसह ५१ धावांची खेळी केली. तर राधा यादवने ३० चेंडूत ३ चौकार व एका षटकारासह ३६ धावांची खेळी केली. याशिवाय वृंदा दिनेशने १९ धावांचं योहगान दिलं. तर इतर फलंदाजांनी जेमतेम धावा केल्या. यासह टीम इंडियाने २० षटकांत ७ बाद १३४ धावसंख्या उभारली. यादरम्यान बांगलादेश अ संघाची कर्णधार फहिमा खातून हिने ४ विकेट्स घेतल्या.

## लेकासाठी आणि पहिल्या पत्नीसाठी हार्दिकचे सरप्राईज,कोट्यवधींची गाडी भेट!

**महाईन्यूज । मुंबई**

**टीम इंडियाचा अष्टपैलू खेळाडू हार्दिक पंड्या सध्या टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये खेळत आहे. विश्वचषकाबरोबरच हार्दिक त्याच्या खाजगी आयुष्यातील घडामोडींमुळे चर्चेत आहे. हार्दिकने नुकताच त्याची नवी गर्लफ्रेंड माहिका शर्माचा वाढदिवस थाटामाटात साजरा केला, ज्याचे फोटो सगळीकडे व्हायरल होत आहे. यादरम्यान त्याने पहिली पत्नी नताशा स्टँकोविक व मुलगा अगस्त्य पंड्याला एक खास कार भेट दिली आहे. ज्याचे फोटो व्हायरल होत आहेत. या कारची किंमत नेमकी किती आहे, जाणून घेऊया.**




हार्दिक पांड्या आणि नतासा स्टॅनकोविक हे दोघे जरी वैवाहिक आयुष्यातून अधिकृतपणे वेगळे झाले असले, तरी त्यांच्या मुलगा अगस्त्यच्या संगोपनाबाबत मात्र त्यांनी अत्यंत समंजस आणि जबाबदार भूमिका घेतली आहे. वैयक्तिक आयुष्यात मतभेद निर्माण झाले, मार्ग वेगळे झाले, तरी मुलाच्या भवितव्यावर त्याचा कोणताही परिणाम होऊ नये, यासाठी दोघेही कटाक्षाने प्रयत्न करत असल्याचे वारंवार दिसून येते. त्यामुळेच हे दोघे पुन्हा एकदा चर्चेत आले असून, यावेळी कारण ठरली आहे ती कोट्यवधी रुपयांची आलिशान मोटार.

भारतीय संघाचा अष्टपैलू खेळाडू म्हणून ओळखला जाणारा हार्दिक पंड्या सध्या टी-२० विश्वचषक २०२६ स्पर्धेत देशाचे प्रतिनिधित्व करत आहे. मैदानावरील त्याची कामगिरी, त्याची आक्रमक फलंदाजी, प्रभावी गोलंदाजी आणि उत्साही देहबोली यामुळे तो कायम चर्चेत असतो. मात्र खेळासोबतच त्याच्या वैयक्तिक आयुष्यातील घडामोडीही नेहमीच चर्चेचा विषय ठरतात. काही महिन्यांपूर्वीच त्याने आणि नताशाने परस्पर संमतीने वेगळे होण्याचा निर्णय जाहीर केला होता. त्या निर्णयानंतर अनेक चर्चांना उधाण आले होते; परंतु दोघांनीही सार्वजनिकरित्या संयम राखत मुलाच्या संगोपनाला प्राधान्य देण्याची भूमिका स्पष्ट केली होती.

अलीकडेच हार्दिकने माहिका शर्मा हिचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा केला. या सोहळ्याची छायाचित्रे आणि दृश्ये सर्वत्र मोठ्या प्रमाणावर प्रसारित झाली. त्यानंतर लगेचच नताशा आणि मुलगा अगस्त्य यांना दिलेल्या महागड्या मोटारीमुळे तो पुन्हा चर्चेत आला. ही मोटार अत्यंत आलिशान आणि आधुनिक सुविधांनी सज्ज असल्याचे सांगितले जाते. तिची किंमत कोट्यवधी रुपयांच्या घरात असल्याने चाहत्यांचे लक्ष वेधले गेले आहे.

नव्या मोटारीची चावी स्वीकारताना नताशाच्या शेजारी अगस्त्यचा छायाचित्रफलक ठेवलेला होता. त्या फलकावर “पप्पांकडून अगस्त्यासाठी प्रेमाची भेट” असा उल्लेख करण्यात आला होता. या छोट्याशा पण भावनिक संदेशातून वडिलांचे मुलावर असलेले प्रेम अधोरेखित झाले. हे दृश्य समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणावर प्रसारित होताच चाहत्यांनी दोघांच्या सहपालनाच्या भूमिकेचे कौतुक केले. वैवाहिक नातेसंबंध संपुष्टात आले असले, तरी मुलाबाबतची जबाबदारी आणि जिव्हाळा कायम असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.

जुलै २०२४ मध्ये अधिकृतपणे वेगळे होण्याचा निर्णय जाहीर केल्यानंतरही हार्दिक आणि नताशा यांनी कोणतीही कटुता सार्वजनिकपणे दाखवली नाही. उलट मुलाच्या आयुष्यात स्थैर्य राहावे, त्याला आई-वडिलांचे प्रेम समान प्रमाणात मिळावे, यासाठी दोघेही सजग असल्याचे दिसते.




PRIYADARSHANI SCHOOL & JR COLLEGE
MOSHI
Balancing Sports and Academics for All-Round Development
ADMISSIONS OPEN
Grade Nursery to Grade XII
WHY CHOOSE PRIYADARSHANI SCHOOL?
43 Years of Excellence in Education | Advanced Robotics & Computer Labs
Experienced and Dedicated Faculty | Multiple Sports Grounds for All-Round Development
Proven 100% Results in Grade X | A Perfect Blend of Tradition and Innovation
+91 9890613333 | +91 9373073077
pgosm05@gmail.com
www.priyadarshanischoolmoshi.in

# राज्यातील उद्योगनगरांत देशातील पहिले 'एआय धोरण'

## एमआयडीसीमार्फत अंमलबजावणी; रोजगारावर होणाऱ्या परिणामाचाही अभ्यास

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**भविष्यात एआय धर्तीवर राज्यातील उद्योगनगरांत काही योजना, लागू करण्याचा विचार राज्य सरकार करत आहे. कंपनीमध्ये प्रत्यक्ष उत्पादन करताना कर्मचारी, कामगारवर्ग हा पाहिजेच; मात्र उद्योगांतील तांत्रिकबाबींत एआयचा वापर करता येईल का, त्याचा रोजगारावर काय परिणाम होईल, याचा देखील अभ्यास करण्यात येईल.**




देशातील उद्योजगातमधील पहिले एआय धोरण पुढील तीन ते चार महिन्यांत राज्यातील उद्योगनगरांत आणणार आहेत, अशी माहिती राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली. चिंचवड येथील एमआयडीसी कर्मचारी वसाहतीच्या उद्घाटनप्रसंगी शनिवार (दि. 21) मंत्री सामंत हे आले होते. त्यावेळी त्यांनी उद्योगविषयक व एमआयडीसीबाबत विविध मुद्यांवर माहिती दिली. एमआयडीसी अंतर्गत विविध प्रकल्प व कामे देखील प्रगतीपथावर असून ती कामे पूर्णत्वाकडे गेल्यानंतर वाहतूककोंडीची समस्या दूर होईल, असे त्यांनी सांगितले. तसेच, नदीसुधार योजनेचा आरखडा तयार केला असून, पिंपरी-चिंचवड, पुणे महापालिका, पीएमआरडीए आणि एकत्रित अडीच हजार कोटी रुपयांचा आराखडा तयार आहे. केंद्रात काही मंजुरी बाकी असून, इंद्रायणी, पवना नदीसुधार प्रकल्पाला मूर्त स्वरुप येईल. देशात सुरू असलेल्या एआय वर्ल्ड कॉन्फरन्सच्या पार्श्वभूमीवर कॉंग्रेसने केलेल्या आंदोलनावर टीका केली. कॉंग्रेसच्या या आंदोलनाने केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा नव्हे, तर देशाचा अपमान केला आहे. कॉंग्रेसला मतदारांनी आधीच नाकारले आहे, असा टोला मंत्री सामंत यांनी लगावला. लोकशाहीत विरोधी पक्ष आवश्यक आहे; मात्र जागतिक व्यासपीठावर कपडे काढून देशाची बदनामी करणारा विरोधी पक्ष किंवा नेता कशाला हवा, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. या घटनेच्या निषेधार्थ शिवसेना राज्यभर आंदोलन करणार आहे. पुढील काळात कॉंग्रेसचे अनेक नेते पक्ष सोडतील, असा दावाही त्यांनी केला.

### संजय राऊत नेमके कोणत्या पक्षाचे

राज्यसभेच्या एका जागेवरुन महाविकास आघाडीत वेगवेगळे मतप्रवाह आहेत. एका गटाने शिवसेनेच्या ठाकरे गटाने दावा केला तर, याच पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे नाव पुढे आणले. त्यामुळे राऊत नेमक्या कोणत्या पक्षाचे आहेत, हे कळत नाही.

### दोन वर्षात 265 घरे

एमआयडीसीच्या बिजलीनगर येथे गृहनिर्माण संस्थेचे उद्घाटन झाले. या ठिकाणी 24 महिन्यांत 265 घरे बांधण्यात आली. एका विभागाला जागा दिल्यानंतर त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी स्वतः च्या मालकीची वसाहत तयार करण्यात आली आहे. तीन वर्षांपूर्वी ही जमीन ताब्यात दिली.

# पिंपरी-चिंचवडमध्ये दरडोई उत्पन्नाचा व्यापक वर्षभर सर्वेक्षण उपक्रम

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**केंद्राच्या वेगवेगळ्या योजना शहरपातळीवर राबविण्यासाठी तसेच शहरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांचे राहणीमान व त्यांचे दरडोई उत्पन्न किती असेल, याचा एक सर्वसमावेशक सर्व्हे हाती घेतला आहे. केंद्राच्या सांख्यिकी विभागाच्या देशभरात वेगवेगळ्या धर्तीवर सर्व्हे सुरू असून, वेगवेगळ्या प्रकारच्या 80 हून अधिक सर्व्हेमध्ये राज्यातील उपक्रम, योजना, पायाभूत सुविधा सुधारण्यास मदत झाली आहे.**



त्यातच आता पुढचा टप्पा म्हणून नागरिकांच्या दरडोई उत्पन्नाचा अर्थात मिळकतीचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. त्याचा खर्च आणि त्याचे प्रमाण या अनुषंगाने गृहितक निश्चित केले जाणार आहे.राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या वतीने देशभरातील नमुना सर्वेक्षणांद्वारे विविध सामाजिक, आर्थिक बाजूंवर प्रकाश टाकतात. या माध्यमातून एका उत्तम आणि आवश्यक डेटा विकसित होत असून, केंद्र व राज्य सरकारला त्याद्वारे विकास नियोजन आणि धोरणे तयार करणे सोपे जात आहे. साधारण एक वर्षाच्या कालावधीत हा सर्व्हे पूर्ण केला जातो. समक्ष गावपातळीवर तसेच वेगवेगळ्या तांत्रिक माहितीच्या आधारे नागरिकांपर्यंत हे पोहोचत आहे. विशेष म्हणजे शहराबरोबरच ग्रामीण भागालाही तेवढेच महत्त्व देण्यात आले आहे.देशभरातील या पहिल्या सर्वेक्षणात राज्यातील 5 हजार 760 घरांना भेटी देण्यात येणार आहे. पुणे, अहिल्यानगर, रत्नागिरी आणि सातारा या चार जिल्ह्यांत हे काम पुढील वर्षभर चालणार आहे. त्याचप्रमाणे कोल्हापूर आणि सोलापूर या दोन उपप्रादेशिक कार्यालयाच्या वतीनेही हे सर्वेक्षण पूर्ण होईल. दिल्ली कार्यालयाच्या वतीने देण्यात येणाऱ्या यादीतून ही घरे निवडली आहेत. त्यात ग्रामीण भागात 10 घरांतून एक सॅम्पल, तर शहरी भागात 20 घरांतून एक सॅम्पल घेण्यात येणार आहे. सांख्यिकी विभागाचे संयुक्त संचालक रुही कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ सांख्यिकी अधिकारी मनोजकुमार हे सर्व्हेचे काम पाहात आहेत.

### असे होणार सर्वेक्षण

कार्यालयाचे अधिकारी हे प्रत्यक्ष फिल्डवर असतात. ते ई-सिग्मा टॅबलेटच्या माध्यमातून माहिती संकलित करतात. हे अधिकारी वैज्ञानिक व अचूक पद्धतीने निवडलेल्या गावांमध्ये अथवा शहरातील ब्लॉक्समध्ये भेटी देतात. साधारण 200 ते 250 असे ब्लॉक्स असतात. त्यानुसार घरांची यादी तयार केली जाते आणि नमुना निवडीनुसार निवडक घरांतील सदस्यांची माहिती घेतली जाते. एका घरासाठी ही प्रक्रिया साधारण एक ते दीड तास चालते. ही संकलित माहिती मंत्रालयाच्या अहवालांमध्ये अतिशय गोपनीय ठेवली जाते.

### दोन सर्वेक्षणांचे 70 टक्के काम पूर्ण

कार्यालयाच्या वतीने सध्या घरगुती पर्यटन खर्च सर्वेक्षण आणि घरगुती प्रवास सर्वेक्षणाचे काम सुरू आहे. त्यात अनुक्रमे 6 हजार 160 आणि 3 हजार 120 घरांना भेटी दिल्या आहेत. त्याचे काम 70 टक्के पूर्ण झाले आहे. हा सर्व्हे जूनपर्यंत चालेल. त्यानुसार विद्यार्थ्यांपासून ते घरातील व्यक्ती कोणत्या साधनातून प्रवास करते हा निष्कर्ष काढून ते ट्रान्सपोर्ट मोड वाढविण्याचा दृष्टिकोन ठेवण्यात आला आहे.

### डेटाची उपयुक्तता

शहरी, ग्रामीण भागातून या संकलित केलेल्या डेटाची माहिती देशाच्या विकासात महत्वाची असते. ही माहिती संबंधित गावासाठी, जिल्ह्यासाठी पायाभूत सुविधा उभारण्यास मदत करते. पर्यटन, प्रवासी यांसारख्या आत्तापर्यंतच्या सर्वेक्षणात या बाबी पुढे आल्या आहेत. त्यातच आखणी, संशोधन, धोरण निर्मिती व अंमलबजावणीसाठी हे सॅम्पल अर्थात डेटा त्याआधारे काम करते.

### दरडोई उत्पन्न सर्वेक्षणात काय तपासले जाणार?

या सर्वेक्षणामध्ये शहरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांचे मिळकतीचे विविध स्रोत कोणते आहेत, याचा सविस्तर अभ्यास केला जाणार आहे. सध्याच्या आर्थिक चढउताराच्या परिस्थितीत नागरिकांची मिळकत वाढते आहे की घटते आहे, तसेच त्यामागील कारणे काय आहेत, याचा शोध घेतला जाईल. समाजातील कोणत्या घटकांची किंवा वर्गाची मिळकत वाढण्याची शक्यता आहे आणि कोणत्या वर्गावर घट होण्याचा परिणाम होऊ शकतो, याचाही आढावा घेतला जाणार आहे.

# इंद्रायणी फेसाळली, बोअरवेल लालसर; आळंदीत प्रदूषणाचा गंभीर इशारा...

## फेसाळ पाणी भूजलात शिरल्याचा संशय; भाविकांत भीती, प्रशासनावर प्रश्नचिन्ह

**महाईन्यूज । आळंदी**

**पवित्र तीर्थक्षेत्र आळंदीतून वाहणाऱ्या इंद्रायणी नदीची अवस्था सध्या अत्यंत दयनीय झाली असून, हे तीर्थक्षेत्र प्रदूषणाच्या विळख्यात अडकले आहे. गेल्या दीड महिन्यांपासून नदीचे पात्र पांढऱ्या शुभ्र रासायनिक फेसाने माखलेले असून, परिसरात पसरलेल्या तीव्र दुर्गंधीमुळे भाविक आणि स्थानिक नागरिकांचे जगणे असह्य झाले आहे.**

धक्कादायक बाब म्हणजे, हे प्रदूषण आता जमिनीखालील जलस्रोतांपर्यंत पोहोचले असून, काही परिसरांतील बोअरवेलमधून लालसर आणि फेसाळ पाणी येऊ लागल्याने शहरात खळबळ उडाली आहे. नदीकाठच्या गावांतून येणारे प्रक्रिया न केलेले मैलामिश्रित सांडपाणी आणि औद्योगिक पट्ट्यातून सोडले जाणारे घातक रासायनिक पाणी थेट नदीत मिसळत आहे. त्यामुळे नदीच्या परिसंस्थेचे मोठे नुकसान झाले आहे. प्रशासनाकडून सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प कार्यक्षम असल्याचे दावे केले जात असले, तरी प्रत्यक्ष परिस्थिती वेगळीच असल्याचे दिसून येत आहे.

आळंदीतील अन्नपूर्णा मातानगर परिसरात काही नागरिकांच्या बोअरवेलमधून लालसर रंगाचे आणि उग्र वास असलेले फेसाळ पाणी येत असल्याचे समोर आले आहे. या पाण्याचा वास इंद्रायणीतील दूषित पाण्यासारखाच असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. यामुळे भूजल प्रदूषणाची शक्यता निर्माण झाली असून, नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.



### पर्यावरण प्रेमींचा संताप

इंद्रायणीच्या या दुरवस्थेमुळे वारकरी संप्रदाय आणि पर्यावरणप्रेमींमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. प्रशासनाने केवळ पाहणी न करता नियमांचे उल्लंघन करणाऱ्या औद्योगिक आस्थापनांवर आणि सांडपाणी थेट नदीत सोडणाऱ्यांवर कठोर फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

> “नदीची आणि भूजलाची ही अवस्था पाहून भीती वाटत आहे. संबंधित विभागाने तातडीने या पाण्याची प्रयोगशाळेत तपासणी करून प्रदूषणाचे मूळ शोधून काढावे. अन्यथा आळंदीत साथीचे रोग पसरायला वेळ लागणार नाही.”
>
> -संजय घुंडरे, स्थानिक नागरिक

> “आम्ही माउलींच्या दर्शनासाठी येतो तेव्हा इंद्रायणीमध्ये स्नान करतो. पण आता नदीकडे बघवतही नाही. हे पाणी आहे की विष, असा प्रश्न पडतो. प्रशासनाने तात्काळ तोडगा काढावा, अन्यथा भविष्यात मोठी किंमत मोजावी लागेल.”
>
> - सौरभ जाधव, वारकरी

### त्वचाविकाराची भीती

इंद्रायणीच्या पवित्र जलात स्नान करण्यासाठी भाविक दुरून येतात. मात्र, सध्या नदीची झालेली अवस्था पाहून भाविक हताश झाले आहेत. रसायनांच्या फेसामुळे त्वचाविकारांची भीती आणि परिसरात पसरलेली दुर्गंधी यामुळे तीर्थक्षेत्राचे पावित्र्य धोक्यात आले आहे.

# पिंपरीत उड्डाणपुलाखालील गाळ्यांची माफियाकडून वर्षानुवर्षे भाडे वसुली

**महाईन्यूज । पिंपरी चिंचवड**

**पिंपरीतील इंदिरा गांधी उड्डाणपुलाखालील लालबहादूर शास्त्री भाजी मंडईतील महापालिकेच्या अधिकृत गाळ्यांचा ताबा राजकीय पदाधिकारी असलेल्या माफियाने घेतला आहे. महापालिकेला या गाळ्यांमधून एक रुपयाचाही महसूल मिळत नाही. कारण भूमी जिंदगी विभाग आणि ‘अ’ क्षेत्रीय कार्यालयाकडे याबाबत कोणतीही नोंद नाही.**

या गाळ्यांमध्ये व्यवसाय सुरू आहेत आणि शेजारी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करण्यात आले आहे. अधिकाऱ्यांचे हात ओले केल्याने माफियाचा कारभार बिनबोभाट सुरू आहे. संबंधित माफियाने एका गाळ्यात स्वतःचे कार्यालय थाटले असून, तेथूनच बेकायदा पार्किंगची आणि गाळ्यांची भाडेवसुली चालते.

भाजी मंडईत येणाऱ्या ग्राहकांच्या अधिकृत पार्किंगसाठी एका कंपनीला महापालिकेने जागा दिली असली, तरी मंडईच्या प्रवेशद्वाराजवळील दोन फळ विक्रेत्यांकडून दिवसाला एक हजार रुपये घेतले जातात. फळ विक्रेत्यांकडून महिन्याला ३० हजार रुपयांची वसुली केली जात असल्याची माहिती आहे.



### बेकायदा पार्किंगमधूनही मोठी कमाई

महापालिकेच्या अधिकृत पार्किंगशेजारीच माफियाचे दुचाकी पार्किंग वर्षानुवर्षे बेकायदा सुरू आहे. रस्त्याकडेला लावलेल्या वाहनांकडूनही वसुली केली जाते. यापूर्वी परिसरातील व्यावसायिकांकडून हप्ते वसूल करणारा हा माफिया विरोध वाढल्याने आता महापालिकेच्या जागेवरील पार्किंगकडे आणि गाळे भाडे वसुलीकडे वळला आहे.

> महापालिकेच्या गाळ्यांची व जागेची सर्व माहिती घेण्याचे काम सुरू आहे. जे महापालिका अधिकारी व कर्मचारी हप्ते वसुली करत आहेत, त्याचीही चौकशी करणार आहोत.
>
> - निवेदिता घार्गे-काटकर, सहायक आयुक्त तथा अ क्षेत्रीय अधिकारी

> पिंपरीतील महापालिकेच्या या गाळ्यांची माहिती ‘अ’ क्षेत्रीय कार्यालयाकडे आहे. या बेकायदा पार्किंगची जागा महापालिकेची आहे. तसे पत्र ‘अ’ क्षेत्रीय कार्यालयाला दिले आहे.
>
> - सीताराम बहुरे, उपायुक्त, भूमी जिंदगी विभाग, महापालिका

www.rklgis.org

RKL GALAXY™
International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution

# TEACHERS' HIRING

**WALK-IN INTERVIEW**

Hiring teachers for all subjects across Pre-Primary, Primary, and Secondary sections for the academic year 2026–27.

## Walk-In Schedule Timings:

**Saturday, 21st February 2026**
**Timing: 11:00 AM to 4:00 PM**

**Monday to Friday**
**Timing: 2:00 PM to 4:30 PM**

## Venue:

RKL Galaxy International School,
Sr. No. 149/5, Opp. Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune – 412105

www.rklgis.org 8698360005

